‘आकाश इनव्हिक्टस-अभियांत्रिकी २.०’ कार्यक्रम

पुणे : ‘आकाश एज्युकेशन सर्व्हिसेस लिमिटेड’ने (एईएसएल) जेईई मेन परीक्षा, जेईई ॲडव्हान्स परीक्षा, बिटसॅट आणि राज्य सामाईक प्रवेश परीक्षांच्या तयारीसाठी ‘आकाश इनव्हिक्टस-अभियांत्रिकी २.०’ हा नवीन शैक्षणिक कार्यक्रम सुरू केला आहे. निकालकेंद्रित अध्यापन, अनुभवी शिक्षक, संशोधनाधारित अभ्यास साहित्य, प्रगत चाचणी प्रणाली, पारदर्शक प्रगती नकाशा आणि वैयक्तिक मार्गदर्शन या सहा स्तंभांवर हा कार्यक्रम आधारित आहे, अशी माहिती ‘आकाश एज्युकेशन’चे व्यवस्थापकीय संचालक चंद्रशेखर रेड्डी गरिसा यांनी दिली.

सकाळ

शेतीसाठी धरणाऐवजी प्रक्रिया केलेले सांडपाणीच वापरावे!

‘सजग नागरिक मंच’ची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

पुणे, दि. १५ (प्रतिनिधी) – मुंढवा जॅकवेलमधून शेतीसाठी शुद्ध केलेले सांडपाणी पुरेशा प्रमाणात उचलले जात नसताना खडकवासला धरणसाखळीतून रब्बी आवर्तनासाठी पाणी सोडले जात असल्याचा आरोप ‘सजग नागरिक मंच’ने केला आहे. यामुळे पुण्याच्या पिण्याच्या पाण्यावर ताण येत असल्याचे सांगत मंचाने ही विसंगती दूर करण्याची मागणी केली आहे. मंचाचे अध्यक्ष विवेक वेलणकर यांनी मुख्यमंत्र्यांना पत्र पाठवून जलसंपदा विभागाला मुंढवा जॅकवेलमधून शुद्ध पाणी शेतीसाठी रोज उचलण्याचे आदेश देण्याची विनंती केली आहे.

पुणे महापालिका दररोज ६५० एमएलडी सांडपाणी शेतीयोग्य करून बेबी कॅनॉलमधून दौंडपर्यंत सोडते, असा दावा पत्रात करण्यात आला आहे. या व्यवस्थेसाठी मुंढवा जॅकवेल उभारण्यावर १०० कोटी रुपये खर्च झाल्याचेही वेलणकर यांनी नमूद केले. मात्र, उपलब्ध फ्लो रेकॉर्डमध्ये ६५० एमएलडी क्षमतेचा तपशील वा मोजमापाचे एकक स्पष्ट दिसत नाही. पूर्ण क्षमतेने जॅकवेलचे पाणी वापरले असते, तर शेतीसाठी धरणातील किमान एक टीएमसी पाणी वाचले असते, ते पाणी पुण्याच्या पिण्यासाठी राखता आले असते, असे पत्रात म्हटले आहे.

पवना धरणात ९५ टक्के साठा; पिंपरी-चिंचवडमध्ये १० टक्के कपात

पुण्यात २० टक्के पाणीकपात

खडकवासलात ८२ टक्के उपयुक्त साठा; साडेदहा महिने टंचाईशी सामना

पुणे/पिंपरी-चिंचवड, दि. १५ (प्रतिनिधी) – पुण्याला पाणीपुरवठा करणाऱ्या खडकवासला धरणसाखळीत सध्या केवळ ८२ टक्के उपयुक्त पाणीसाठा शिल्लक आहे. एवढ्याच पाण्यावर पुणेकरांना साडेदहा महिने काढावे लागणार असल्याने पाणी जपून वापरावे लागणार आहे. दरम्यान, पाणीसाठ्याची ही टक्केवारी लक्षात घेत जिल्हाधिकाऱ्यांनी पुण्यात २० टक्के पाणीकपातीचा निर्णय घेतला आहे. पिंपरी-चिंचवडला पाणीपुरवठा होणाऱ्या पवना धरणात ९५ टक्के साठा शिल्लक असल्याने तेथे सरकारच्या निर्देशानुसार १० टक्केच पाणीकपात केली जाणार असल्याचे जिल्हाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

‘एल निनो’च्या प्रभावामुळे पुढील वर्षीही मान्सूनचे आगमन उशिरा होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर उपलब्ध पाणीसाठ्याचे ३१ ऑगस्ट २०२७पर्यंत नियोजन करावे लागणार आहे. या नियोजनाबाबत जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी आज पत्रकार परिषदेत माहिती दिली.

दरम्यान, पाणी नियोजनाबाबत डुडी यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. या बैठकीस पुणे महापालिकेचे आयुक्त नवलकिशोर राम, पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, जलसंपदा विभागाचे मुख्य अभियंता अमोल कोल्हे, अधीक्षक अभियंता पृथ्वीराज फाळके, पुणे महापालिकेचे मुख्य अभियंता नंदकिशोर जगताप यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

डुडी म्हणाले, ‘२०१३मध्ये खडकवासला धरणसाखळीत ७० टक्क्यांपेक्षा कमी पाणीसाठा होता. त्या तुलनेत सध्या ८२ टक्के पाणी उपलब्ध आहे. त्यामुळे उपलब्ध पाण्याचा योग्य वापर करणे आवश्यक आहे.’

शहरात दिवसाआड पाणीपुरवठा करण्याची जलसंपदाची मागणी

खडकवासला प्रकल्पात १५ ऑक्टोबर रोजी मृतसाठा, बाष्पीभवन आणि बफर साठा वगळता अंदाजे २० टीएमसी पाणी उपलब्ध असल्याची माहिती बैठकीत देण्यात आली. हा साठा दरवर्षीच्या तुलनेत अंदाजे २५ टक्क्यांनी कमी असल्याने उपलब्ध पाणी पिण्यासाठी आणि सिंचनासाठी पुरविताना काटेकोर नियोजन करावे लागणार आहे. या पार्श्वभूमीवर पुणे शहरातील पाणीपुरवठ्यात २५ टक्के कपात करण्याची आवश्यकता असल्याचे सांगत शहरात एक दिवसाआड पाणीपुरवठा करण्याची मागणी जलसंपदाचे अधीक्षक अभियंता पृथ्वीराज फाळके यांनी बैठकीत केली.

उन्हाळी आवर्तन अशक्य

पवना, भामा आसखेड, चासकमान आणि नीरा प्रकल्पांमध्ये ९० ते ९५ टक्के पाणीसाठा उपलब्ध असला, तरी ३१ ऑगस्ट २०२७ पर्यंत पाणीपुरवठा टिकवून ठेवण्यासाठी सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांनी २० टक्के पाणी कपात करण्याच्या दृष्टीने नियोजन करावे, अशा सूचना बैठकीत करण्यात आल्या. उपलब्ध पाण्याचा विचार करून रब्बी हंगामासाठी सिंचन आवर्तन देण्यात येणार आहे. मात्र, सर्व प्रकल्पांमधील पाण्याचे नियोजन केल्यानंतर उन्हाळी हंगामातील सिंचनासाठी पुरेसा साठा शिल्लक राहण्याची शक्यता नसल्याने उन्हाळी सिंचन आवर्तन देणे शक्य होणार नसल्याचे बैठकीत स्पष्ट करण्यात आले.

आठवडाभरात कपातीचे नियोजन – आयुक्त नवलकिशोर राम

पुणे : ‘पुणेकरांवरील पाणीकपातीचे संकट अधिक गडद झाले आहे. जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत स्थानिक स्वराज्य संस्थांना २० टक्के पाणीकपातीचे नियोजन करण्याच्या सूचना देण्यात आल्या. त्यानुसार पुणे महापालिका आठवडाभरात कपातीचे नियोजन करणार आहे,’ अशी माहिती महापालिका आयुक्त नवलकिशोर राम यांनी दिली. २० टक्के पाणीकपात नियोजनामुळे दिवसाआड पाणीपुरवठा सुरू होण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. शहरात गुरुवारची ‘पाणीबंदी’ आजपासून लागू झाली आहे. या उपायामुळे सुमारे १० टक्के पाणीकपात होत असल्याचे आयुक्तांनी सांगितले. आणखी कपात कशी करायची, याचा भागनिहाय विचार सुरू आहे. काही भागांत पुरेसे पाणी मिळते, तर काही ठिकाणी आधीच नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागतो. त्यामुळे सर्वत्र सरसकट कपात न करता, सूक्ष्म पातळीवर नियोजन करावे लागेल, असे राम म्हणाले.

योग्य नियोजन करा – जिल्हाधिकारी

पुणे : ‘दरवर्षी १५ ऑक्टोबरपर्यंत धरणे १०० टक्के भरलेली असतात. त्यामुळे जूनअखेरपर्यंतच्या पाण्याचे नियोजन केले जाते. मात्र, यंदा खडकवासला धरणसाखळीमध्ये उपयुक्त पाणीसाठा ८२ टक्केच आहे. त्यामुळे भविष्यातील पाणीटंचाई टाळण्यासाठी पुण्यात २० टक्के पाणीकपात करण्याचा निर्णय घ्यावा लागत आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा पाणीसाठा कमी असला, तरी योग्य नियोजन केल्यास पाणीटंचाईची भीषण परिस्थिती निर्माण होणार नाही,’ असे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी म्हणाले.

पाण्याचा अपव्यय केल्यास कडक कारवाई – आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी

पिंपरी : ‘अपुऱ्या पर्जन्यमानामुळे आगामी काळात पाणीटंचाईची शक्यता लक्षात घेता, पिंपरी-चिंचवड शहरात उद्या शुक्रवारपासून १० टक्के पाणीकपात लागू करण्यात येणार आहे. तसेच नागरिकांनी पिण्याच्या पाण्याचा वापर अत्यंत जबाबदारीने आणि काटकसरीने करावा; अन्यथा कडक कारवाई करण्यात येईल,’ असा इशारा महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी दिला आहे. तसेच ‘पाण्याचा गैरवापर रोखण्यासाठी प्रभागस्तरावर विशेष तपासणी पथके नियुक्त करण्यात आली आहेत.पाण्याचे नियोजन आणि काटकसरीसाठी महापालिकेने कार्यवाही सुरू केली आहे. नवीन गृहप्रकल्पांना पूर्ण क्षमतेने पाणीपुरवठा करणे शक्य नसल्याने त्यांना पिण्याच्या पाण्यापुरते मर्यादित व्यासाचे नळजोड देण्यात येतील. महापालिकेच्या नळजोडाला विद्युत पंप लावून पाणीउपसा केल्याचे आढळल्यास संबंधित विद्युत पंप जप्त करून दंडात्मक कारवाई करण्यात येईल. याशिवाय वॉशिंग सेंटर्स आणि इतर मोठ्या व्यावसायिक प्रकल्पांना नवीन नळजोड दिले जाणार नाहीत. व्यावसायिक आस्थापना, बांधकाम प्रकल्प आणि इतर बिगर घरगुती वापरकर्त्यांनी आवश्यक पाण्याची व्यवस्था स्वतःच्या स्तरावर करावी. पिण्याच्या पाण्याचा गैरवापर होत असल्याचे आढळल्यास कारवाई करण्यात येईल,’ असे सूर्यवंशी यांनी सांगितले.

- **अनधिकृत पाणीउपसा रोखण्यासाठी महसूल, महावितरण, पोलीस आणि जलसंपदा विभाग यांची संयुक्त भरारी पथके स्थापना करणार.**
- **अनधिकृत पाणीउपसा आढळल्यास पंप व मोटारी जप्त करणार. शेतीसाठी पाणीचोरी केल्यास संबंधित शेतकऱ्याचा वीजजोड तोडणार.**
- **पिंपरी-चिंचवडमध्ये गृहनिर्माण सोसायट्यांना उद्याने, झाडांसाठी प्रक्रिया केलेले सांडपाणी वापरणे बंधनकारक. अन्यथा सोसायट्यांचे नळजोड तोडणार.**
- **नदीतून अनधिकृत उपसा करून ते पाणी टँकरद्वारे विक्री केल्यास फौजदारी गुन्हा दाखल करणार. बांधकामांसाठी ‘एसटीपी’तील पाणी वापरण्याचे बंधन.**

माथाडी निरीक्षक परीक्षेचा निकाल संशयास्पद

अभ्यासक्रमाबाहेरील प्रश्न; नागपूर केंद्रातून सर्वाधिक निवड; सुषमा अंधारे यांचा आरोप

पुणे, दि. १५ (प्रतिनिधी) – माथाडी कामगार निरीक्षकपदाच्या ६२ जागांसाठी घेण्यात आलेल्या परीक्षेचा निकाल संशयाच्या भोवऱ्यात सापडला आहे. नागपूर परीक्षा केंद्रातून सर्वाधिक २४ उमेदवारांची निवड झाल्याने आणि अभ्यासक्रमाबाहेरील प्रश्न विचारण्यात आल्याने परीक्षेच्या पारदर्शकतेवर प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी पत्रकार परिषदेत केली. यावेळी शिवसेनेचे सहसंपर्कप्रमुख गजानन थरकुडे आणि प्रसिद्धीप्रमुख अनंत घरत उपस्थित होते.

राज्यात पुणे, नागपूर आणि छत्रपती संभाजीनगरसह विविध केंद्रांवर ही परीक्षा घेण्यात आली. पुणे केंद्रावर सर्वाधिक विद्यार्थी असतानाही नागपूर केंद्रातून सर्वाधिक उमेदवार निवडले गेल्याचा मुद्दा अंधारे यांनी उपस्थित केला. एकूण ६२ जागांपैकी २४ उमेदवार नागपूर केंद्रातील आहेत. या उमेदवारांच्या इतर परीक्षांतील कामगिरीची तपासणी केल्यास काहींची गुणांची टक्केवारी ५० टक्क्यांपेक्षा कमी असल्याचे, तर काहींना दोन ते चार गुण मिळाल्याचे अंधारे यांनी सांगितले.

या परीक्षेच्या अभ्यासक्रमात ५२ कायद्यांचा समावेश असताना अभ्यासक्रमाबाहेरील दोन कायद्यांवर २४ प्रश्न विचारण्यात आले. या प्रश्नांमुळे एकूण ४८ गुणांवर परिणाम झाल्याचेही त्यांनी सांगितले. परीक्षेचा निकाल ‘टीसीएस’ संस्थेकडून अधिकृतपणे जाहीर होणे अपेक्षित असताना प्राप्त स्क्रीनशॉटनुसार निधी चांदूरकर नावाच्या खासगी व्यक्तीने निकाल प्रसिद्ध केल्याचे अंधारे यांनी सांगितले. तसेच परीक्षेचा ‘रॉ स्कोअर’ जाहीर न करता ‘नॉर्मलायझेशन’ प्रक्रिया राबवण्यात आल्याबाबतही त्यांनी आक्षेप घेतला.

परीक्षेदरम्यान विद्यार्थ्यांनी संगणकावरील माऊस किती वेळा फिरवला, याची माहिती मिळाली पाहिजे. ज्या लॅबमध्ये परीक्षा झाली, त्या लॅबचीही चौकशी करावी. या प्रकरणातील गैरप्रकारांच्या चौकशीसाठी नेमलेल्या समितीकडे पुराव्यांची प्रत पाठविणार असल्याचे त्यांनी सांगितले.

‘कुराश’चे बनावट प्रमाणपत्र; १९ पोलिसांची नोकरी जाणार

पुणे, दि. १५ (प्रतिनिधी) – ‘कुराश’ खेळाच्या बनावट प्रमाणपत्रांच्या आधारे खेळाडू आरक्षणातून पुणे शहर पोलीस दलात भरती झालेल्या १९ जणांना कायमचे सेवेतून काढून टाकण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी ही माहिती दिली. यांपैकी नव्याने लागलेल्या १० जणांना सेवेत रुजू करून घेण्यात आले नव्हते, तर नऊजणांना विविध प्रशिक्षण केंद्रांत पाठविण्यात आले होते. त्यांनाही परत बोलावून घेण्याचे आदेश देण्यात आले आहेत. संबंधित उमेदवारांवर कायदेशीर कारवाईचीही शक्यता आहे.

‘त्या’ १९ संघटना पोलिसांच्या ‘रडारवर’

कुराश खेळाच्या तालुका, जिल्हा आणि राज्यस्तरीय स्पर्धांचे आयोजन करणाऱ्या १९ संघटना आणि त्या चालविणाऱ्या व्यक्ती पुणे पोलिसांच्या ‘रडारवर’ आहेत. गुन्हे शाखेने त्यांची माहिती संकलित केली असून, या प्रकरणातील तपासाच्या आधारे संबंधितांवरही लवकरच कारवाई होण्याची शक्यता वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी व्यक्त केली आहे.

संबंधित उमेदवार खेळाडू नसतानाही त्यांचे ‘खेळाडू’ म्हणून अभिलेख तयार करून प्रमाणपत्रे देण्यात आल्याचे तपासात निष्पन्न झाले. याप्रकरणी गुन्हे शाखेने महाराष्ट्र राज्य कुराश असोसिएशनचे अध्यक्ष अंकुश नागर, सचिव शिवाजी साळुंखे यांच्यासह चौघांना अटक केली आहे. त्यामध्ये क्रीडा प्रशिक्षण केंद्र चालविणाऱ्या श्रुती पुनगावकर, त्यांचे पती धैर्यशील यांचा समावेश आहे. अपर पोलीस आयुक्त तेजस्वी सातपुते यांच्या मार्गदर्शनाखाली उपायुक्त गौहर हसन, सहायक आयुक्त शंकर खटके यांच्याकडून तपास सुरू आहे.

‘म्युनिशन्स’च्या अधिकाऱ्यासह तिघांना पोलीस कोठडी

पुणे, दि. १५ (प्रतिनिधी) – लाचखोरी प्रकरणात संरक्षण मंत्रालयाच्या अखत्यारीतील ‘म्युनिशन्स इंडिया लिमिटेड’ या सार्वजनिक संरक्षण उत्पादन कंपनीचा पुण्यातील कार्यकारी संचालक अनिलकुमार बी. आर., त्याचा भाऊ हर्षवर्धन बी. आर. आणि कथित लाच देणारा व्यावसायिक आशीष कन्सल यांना विशेष सीबीआय न्यायालयाने १९ ऑक्टोबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली.

सरकारी कामांत खासगी कंत्राटदारांना लाभ मिळवून देण्यासाठी लाच घेतल्याप्रकरणी केंद्रीय अन्वेषण विभागाच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) १२ ऑक्टोबर रोजी गुन्हा दाखल केला. त्यानंतर अनिलकुमार याच्या येरवडा येथील सरकारी निवासस्थानी झडती घेऊन एक कोटी ६७ लाख ९० हजार रुपयांची रोकड जप्त केली. अनिलकुमार याचा भाऊ हर्षवर्धन ही रोकड तेथून दुसरीकडे नेण्याच्या तयारीत असतानाच ‘सीबीआय’ने ही कारवाई करत दोघांना अटक केली. सरकारी कामात खासगी कंत्राटदार आणि पुरवठादारांना लाभ मिळवून देण्यासाठी ही लाच घेण्यात आल्याचा संशय आहे. या गुन्ह्यात कथित लाच देणारा व्यावसायिक आशीष कन्सल याला सीबीआयने १३ ऑक्टोबर रोजी दिल्लीतून अटक केली. तपासासाठी आरोपींना पोलीस कोठडी देण्याची मागणी तपास अधिकारी निरीक्षक अविनाश गुप्ता आणि विशेष सरकारी वकील अभयराज आरीकर यांनी केली.

आरोपींतर्फे ॲड. ए. बी. भुजबळ आणि ॲड. मयूर माळी यांनी बाजू मांडली. विशेष न्यायाधीश आर. आर. मेंढे यांनी दोन्ही बाजू ऐकून घेतल्यानंतर अटकेची कारवाई न्याय्य ठरवली.

धमकीमुळे तरुणाची आत्महत्या

पुणे, दि. १५ (प्रतिनिधी) – ड्रग्जच्या खोट्या गुन्ह्यात अडकवण्याची धमकी देत वारंवार पैशांची मागणी केल्याने २२ वर्षीय तरुणाने आत्महत्या केल्याचा प्रकार खराडी येथे समोर आला आहे. या धमक्यांमुळे तरुणाला मानसिक त्रास झाल्याचा आरोप त्याच्या वडिलांनी केला आहे. याप्रकरणी खराडी पोलिसांनी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

अजयकुमार भाटिया आणि अन्य एक अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत, तर शिखर कुमारगौरव सक्सेना (वय २२) असे मृत तरुणाचे नाव आहे. याबाबत त्याचे वडील कुमारगौरव सुधीरकुमार सक्सेना (वय ४६, रा. हरिद्वार, उत्तराखंड) यांनी फिर्याद दिली आहे.

खराडी तालीला एका सोसायटीच्या इमारतीवरून उडी मारून शिखरने आत्महत्या केली. या प्रकरणाचा तपास खराडी पोलीस करत आहेत.

जाहीर सूचना

प्रादेशिक संचालक, कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालय, पश्चिम विभाग, मुंबई यांच्यासमोर कंपनी अधिनियम, 2013च्या कलम 12(5) आणि कंपनी(निगमन) नियम, 2014 च्या नियम 28 अंतर्गत

आणि

ग्रोविथप्लस ॲग्रो प्रायव्हेट लिमिटेड (GROWITHPLUS AGRO PRIVATE LIMITED)
CIN: U46301PN2025PTC246590

नोंदणीकृत कार्यालयः फ्लॅट क्र. ए102, मार्व्हल, आर.के. लक्ष्मण गॅलरीजवळ, बाणेर गाव, पुणे, हवेली, महाराष्ट्र- 411045.

... अर्जदार कंपनी

सर्वसामान्य जनता, धनको व सभासद यांना याद्वारे सूचित करण्यात येते की, अर्जदार कंपनी आपले नोंदणीकृत कार्यालय महाराष्ट्र राज्यांतर्गत कंपनी निबंधक(ROC), पुणे यांच्या अधिकारक्षेत्रातून कंपनी निबंधक(ROC), मुंबई यांच्या अधिकार क्षेत्रात स्थलांतरित करण्यास पुष्टी मिळविण्यासाठी कंपनी अधिनियम, 2013च्या कलम 12(5) अंतर्गत प्रादेशिक संचालक, पश्चिम विभाग, मुंबई यांच्याकडे अर्ज करण्याचे प्रस्तावित करीत आहे. कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयाचा प्रस्तावित नवीन पत्ता पुढीलप्रमाणे असेल: **कार्यालय क्र.1002, 10वा मजला, कैसाल्लांका, भूखंड क्र.45, सेक्टर 11, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई, महाराष्ट्र- 400614.** सदर प्रस्तावित स्थलांतर हे अर्जदार कंपनीच्या सभासदांनी दिनांक **12/10/2026** रोजी झालेल्या असाधारण सर्वसाधारण सभेत (EGM) मंजूर केलेल्या विशेष ठरावानुसार आहे.

नोंदणीकृत कार्यालयाच्या प्रस्तावित स्थलांतरामुळे ज्या कोणत्याही व्यक्तीच्या हितसंबंधांवर परिणाम होण्याची शक्यता आहे, अशा व्यक्तीने आपली लेखी हरकत **प्रादेशिक संचालक, पश्चिम विभाग, कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालय, 5वा मजला, 100 एक्झिस्ट बिल्डिंग, मरीन ड्राइव्ह, मुंबई 400002** या पत्यावर प्रत्यक्ष सादर करावी किंवा नोंदणीकृत टपालाने पाठवावी. सदर हरकतीसोबत संबंधित व्यक्तीच्या हितसंबंधाचे स्वरूप व विरोधाची कारणे नमूद करणारे प्रतिज्ञापत्र जोडणे आवश्यक आहे. हरकत ही सूचना प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून **चौदा (14) दिवसांच्या आत** प्रादेशिक संचालकांकडे पोहोचली पाहिजे. हरकतीची एक प्रत त्याच वेळी अर्जदार कंपनीच्या वर नमूद केलेल्या विद्यमान नोंदणीकृत कार्यालयाच्या पत्यावर पाठविणे आवश्यक आहे.

ग्रोविथप्लस ॲग्रो प्रायव्हेट लिमिटेड
(GROWITHPLUS AGRO PRIVATE LIMITED)
करिता व त्यांच्या वतीने

Dhareshwar Vidya Va Krida Pratishthan's
Dhareshwar Shikshanshstra Mahavidyalaya, (B.Ed.) Dhayari, Pune-41.

Approved by NCTE- New Delhi and DHE - Maharashtra.
Affiliated to Savitribai Phule Pune University of Pune
and
Recognized by NCTE, Govt. of Maharashtra & Savitribai Phule Pune University
ID NO.PU/PN/B.Ed./316/2008

Web Site:- dcepune.com/Contact No:- 9922694100

Admission Open 2026-27
B.Ed.

Applications are invited from eligible candidates for admission in Two Years Full Time Bachelor of Education (B.Ed.) Programme.

For A.Y.-2026-27 for Institute Level Vacant seats.

DHE Code:-26002Choice Code: 2600210811

Admission Cut of Date:- 21/10/2026 to 23/10/2026

Principal

शिंदे, अजित पवार गटाला डावलत भाजपचे ‘एकला चलो रे’!

विधानपरिषद निवडणूक

पुणे, दि. १५ (प्रतिनिधी) – विधानपरिषदेच्या पुणे विभाग पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघांच्या निवडणुकांमध्ये महायुतीतील अंतर्गत नाराजी उफाळून आल्याचे चित्र आहे. भाजपने दोन्ही मतदारसंघांमध्ये उमेदवार जाहीर केल्याने नाराज असलेले शिंदे आणि अजित पवार गट अद्यापि भाजपच्या प्रचारापासून दूर आहेत. भाजपनेदेखील उमेदवारी अर्ज भरण्यापासून ते निवडणूक नियोजनाच्या बैठकांपर्यंत या दोन्ही घटक पक्षांना सहभागी करून घेतले नाही. त्यामुळे भाजपनेच या दोन्ही गटांना टाळले असल्याचे चित्र समोर आल्याने राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे.

शिंदे गटाने शिक्षक, तर अजित पवार गटाने पदवीधर मतदारसंघावर दावा केला होता. विशेष म्हणजे, पदवीधर मतदारसंघ ही अजित पवार गटाची विद्यमान जागा होती. मात्र, भाजपने दोन्ही जागांवर स्वतःचे उमेदवार जाहीर केल्याने मित्रपक्षांमध्ये नाराजी निर्माण झाली. त्याचे पडसाद आता प्रचारातही उमटताना दिसत आहेत. सध्या तरी प्रचारात भाजपने ‘एकला चलो रे’ची भूमिका घेतल्याचे दिसते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत बुधवारी बावधन येथे झालेल्या निवडणूक नियोजनाच्या बैठकीलाही या दोन्ही गटांच्या पदाधिकाऱ्यांना भाजपकडून निमंत्रण देण्यात आले नव्हते. त्यामुळे महायुतीतील घटक पक्षांना भाजपने जाणीवपूर्वक बाजूला ठेवले आहे का? असा प्रश्न उपस्थित होत आहे. निवडणूक प्रचार सुरू असतानाही या दोन्ही पक्षांकडून स्वतंत्र प्रचार यंत्रणा सक्रिय झालेली नाही. कार्यकर्त्यांनाही प्रचाराबाबत स्पष्ट सूचना मिळाल्या नसल्याने संभ्रमाचे वातावरण आहे.

दरम्यान, नाराजी दूर करण्यासाठी भाजपकडून बुधवारी रात्री उशिरा अजित पवार गटाच्या काही नेत्यांना स्नेहभोजनाचे निमंत्रण देण्यात आल्याचे समजते. या ‘डिनर डिप्लोमसी’त नेमकी काय चर्चा झाली आणि त्यातून प्रचारातील नाराजी दूर झाली का? याबाबत स्पष्ट माहिती समोर आलेली नाही. महायुती म्हणून निवडणुकीला सामोरे जाण्याऐवजी भाजपने दोन्ही मतदारसंघांमध्ये स्वतःचीच प्रचार यंत्रणा राबविल्याचे सध्याचे चित्र आहे.